झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा. /तां३/ १८५/२०२५
दिनांक : २३ /०१/२०२५

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता)

**(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये योजनेस अंतिम प्रशासकीय मान्यता)**

६० २९/१/२०२५

प्रस्तावना :

१. मौजे, पिंपरी सि.स.नं ६६१३/३, (स.नं.१०० पै) मध्ये अस्तित्वात असलेल्या विठ्ठलनगर येथील झोपडपट्टी संदर्भात ३३२६०.९८ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०१/०१/२०२१ रोजी सदर मिळकतीवरील ७४.०१ % झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

२. सदर प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.२९/०८/२०२३ रोजी सन २०१४ च्या विशेष नियमावलीतील नियम क्र. एस.आर.४ (३) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/सुचना अथवा तक्रार या प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

३. सदर प्रारुप योजनेसंदर्भात सर्व संबंधितांचे म्हणणे व दाखल असलेली कागदपत्रे आणि पुरावे विचारात घेऊन या प्राधिकरणामार्फत दि.२९/०८/२०२३ रोजी सदर क्षेत्रासंबंधीत उपलब्ध केलेल्या प्रारूप योजनेमध्ये नमूद बाबीं व्यतिरिक्त खालील बाबी विकसक यांच्यावर बंधनकारक राहतील:

अ) अंतिम पात्रता यादीनुसार जे अपात्र ठरतील, त्यांचे जागेवर निष्कासन करून जागा बोजविरहित करणे.

ब) आरक्षणाखालील जागा मनपास मंजुरीनुसार हस्तांतरित करणे.

४. दि.२९/०८/२०२३ रोजी प्रसिध्द केलेली प्रारूप योजना या आदेशामधील नमूद बाबींसह अंतिम करण्यात येत असून योजनेस नियम क्र. १४.६.१२(१) नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदरच्या योजनेत आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदल करण्यात येतील व ते झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस अवगत करण्यात येतील.

५. सदर योजनेद्वारे विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर

योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

६. सदर योजनेचे विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाचे अन्य संविधानिक प्राधिकरण तसेच झो.पु.प्राधिकरणाचे सर्व नियम लागू राहतील व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

७. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील.

सदर योजना राबविण्यास नियम क्र. १४.६.१२(१) नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून,माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह आदेश जारी करण्यात येत आहेत. प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे असल्यास, ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे करता येईल याची नोंद घ्यावी.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-**२३/०१/२०२५

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
   a) सक्षम प्राधिकारी क्र.३- आपणामार्फत सदर प्रकरणी परिशिष्ट-२ संदर्भात जुन्या योजनेमधील लाभार्थी वगळण्याची परिपूर्ण खात्री करून दुबार लाभ देय होणार नाही,यांची खात्री करावी.
   b) सहा.निबंधक ,सहकारी संस्था - सदर प्रकरणी सहकारी संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
   c) संगणक शाखा - सदर आदेशास संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.
३. **जमिनीचे भोगवटादार** - मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - गायरान जमिनी संदर्भातील प्रचलित न्यायालयीन निर्णय/शासन निर्देशानुसार या प्रकरणी कोणताही निर्बंध असल्यास तसे कळवावे हि विनंती.
४. विकसक- **मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स** १ ते ७ शौकत गंझील , नेहरुनगर, पिंपरी, पुणे-१८.